आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ जानेवारी २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी केंद्र सरकारकडून अधिसूचना जारी

- अंबरनाथमधल्या काँग्रेसच्या १२ नगरसेवकांचा भाजपामध्ये प्रवेश

- ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांचं निधन

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधु उपांत्यपूर्व फेरीत

<><><><><>

केंद्र सरकारनं जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. त्या आधीचे १५ दिवस नागरिकांना स्वतःहून या घरांच्या गणनेची माहिती देता येईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्येची गणना होईल. मोबाइल ॲपद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल.

<><><><><>

अंबरनाथ नगरपालिकेतल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित १२ नगरसेवकांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत त्यांचा नवी मुंबईत हा कार्यक्रम झाला.

भाजपासोबत युती केल्यानं काँग्रेसनं काल त्यांचं निलंबन केलं होतं. पक्षाने आम्हाला विश्वासात न घेता थेट निलंबनाची कारवाई केली, असा आरोप अंबरनाथ कार्यकारिणीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी केला होता.

त्यानंतर ते भाजपात प्रवेश करणार असल्याची घोषणा काल रात्री रविंद्र चव्हाण यांनी केली होती. अंबरनाथच्या विकासासाठी आणि नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी हे सर्व नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. हा निर्णय कोणत्याही सत्तालोभापोटी नसून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित असल्याचं चव्हाण म्हणाले होते.

<><><><><>

उल्हासनगरातली गुंडशाही मोडून शहराचा चेहरामोहरा बदलण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. तसंच, उल्हासनगरच्या सर्वांगीण विकासासाठी हजारो कोटींच्या निधीची घोषणाही त्यांनी केली. एमएमआरडीएच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातल्या विविध विकासकामांसाठी ४ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मेट्रो सेवेचा समावेश असेल. तसंच शहरातली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी ई-बस सुविधा सुरू करण्यात येईल, अशी आश्वासनं मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर इथं काल एमआयएम पक्षाच्या प्रचाररॅली दरम्यान, बेकायदेशीर जमाव करणं, दंगल भडकावल्याप्रकरणी ६० जणांविरोधात  गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातल्या १३ जणांची ओळख पटली आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी माजी खासदार इम्तियाज जलील यांची पायी मिरवणूक सुरू असताना एमआयएम आणि प्रतिस्पर्धी गटाच्या लोकांमधे  मारामारी झाली. यावेळी काही जणांनी जलील यांच्या कारवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><><>

येत्या १५ तारखेला होणाऱ्या वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीत मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हॉटेल बिलांमध्ये तसंच रिक्षा भाडं आणि बस तिकीटांवर विशेष सवलत देण्याची योजना आखली आहे. यासंदर्भात पालिकेने एक अधिकृत पत्रक जारी केलं आहे.  त्यामुळे आता वसई विरार महापालिकेच्या निवडणुकीत मतदारांना हॉटेल बिलावर १५ टक्के सवलत तर रिक्षाच्या भाड्यात ५० टक्के सूट मिळणार आहे. महानगरपालिका परिवहन विभागाने मतदारांसाठी बस भाड्यात विशेष सवलती जाहीर केल्या आहेत.

<><><><><>

बिहारसह इतर अनेक राज्यांमध्ये मतदार याद्या विशेष पुनरिक्षण फेर-पडताळणी कार्यक्रम हाती घेण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवरची अंतिम सुनावणी सर्वोच्च न्यायालयानं येत्या मंगळवारपर्यंत पुढे ढकलली आहे.  सुनावणीची प्रक्रिया १३ जानेवारी रोजी पुन्हा सुरु होईल, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पिठानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. भारताच्या पर्यावरण विषयक संशोधन आणि संवर्धन धोरणाला आकार देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आपल्या सहा दशकांपेक्षा जास्त वैज्ञानिक कारकिर्दीत, पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. पश्चिम घाटातली जैव विविधता वाचवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष आहेत. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

\- **- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(माधव गाडगीळ यांनी पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात जीवशास्त्र या विषयात पदवी मिळवली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर पदवी, आणि १९६९ साली हार्वर्ड विद्यापीठातून पीएचडी केली. हार्वर्ड मध्ये त्यांनी गणितीय पर्यावरणशास्त्र आणि प्राण्यांच्या वर्तनावर काम केलं. भारतात परतल्यावर ते बंगळुरू इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या संस्थेत रुजू झाले. संस्थेच्या पर्यावरण विज्ञान केंद्राचे ते संस्थापक होते. निवृत्ती नंतर ते पुण्यातली आघारकर संशोधन संस्था आणि गोवा विद्यापीठातल्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी झाले.*

*गाडगीळ यांनी पंतप्रधानांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासह अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम केलं.*

*पश्चिम घाटातली जैवविधता जपण्यासाठी आणि त्याचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी डॉ.माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालच्या तज्ज्ञ समितीने तयार केलेला 'गाडगीळ अहवाल' महत्वाचा ठरला.*

*जागतिक जैवविविधतेचं आकर्षण केंद्र असलेल्या पश्चिम घाटावरच्या त्यांच्या मोलाच्या कामगिरीबद्दल, २०२४ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी गाडगीळ यांना 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरण क्षेत्रासाठीचा हा सर्वोच्च सन्मान आहे.*

*गाडगीळ यांनी 'थिस फिशर्ड लॅंड' आणि 'इकॉलॉजी अँड इक्विटी' यासारख्या प्रभावी पुस्तकांचं लेखन आणि सह-लेखन केलं. त्यांचे २५० पेक्षा जास्त शोध-निबंध प्रकाशित झाले आहेत.*

*डॉ. माधव गाडगीळ यांना भारत सरकारने १९८१ मध्ये पद्मश्री आणि २००६ मध्ये पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. तसंच शांती स्वरूप भटनागर पुरस्कार, व्होल्वो पर्यावरण पुरस्कार आणि पर्यावरण क्षेत्रातल्या कामगिरीसाठी टायलर पुरस्कार यासारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.)*

<><><><>

राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><>

प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानरंजन यांचं काल मध्यप्रदेशामधल्या जबलपूर इथं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. काल सकाळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, मात्र उपचारादरम्यान रात्री त्यांची प्राणज्योत मालवली.

महाराष्ट्रातल्या अकोला इथं २१ नोव्हेंबर १९३६ ला ज्ञानरंजन यांचा जन्म झाला. शिक्षण आणि नोकरीनिमित्त महाराष्ट्र, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात त्यांनी आपलं जीवन व्यतित केलं. ज्ञानरंजन यांचे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध असून ‘कबाडखाना’ या त्यांच्या पुस्तकामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली. त्याचप्रमाणे ‘पहल’ या मासिकाचं संपादन त्यांनी अनेक वर्षं केलं. साहित्य भूषण, मध्यप्रदेशाच्या साहित्य परिषदेचा पुरस्कार, शिखर पुरस्कारासह ते अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत. जबलपूर इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

<><><><>

नांदेड जिल्ह्यात माहूर इथल्या रेणुकादेवी संस्थानच्या सेवेत गेल्या ५ वर्षांपेक्षा जास्त काळ असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याचा निर्णय

संस्थेच्या विश्वस्त मंडळानं घेतला आहे. या निर्णयानुसार ६४ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ नियुक्ती पदावर संबंधित वेतन श्रेणीत सामावून घेतलं जाईल.

<><><><><>

महसूल विभागाच्या पथकानं काल भंडारा जिल्ह्यात एका राईस मिलवर छापा घालून रेती वाहतूक करणारे १७ ट्रक जप्त केले. वरठी मोहगाव देवी इथं असलेल्या जय गुरुदेव राईस इंडस्ट्री इथं अवैध रेती वाहतुकीसाठी वापरले जाणारे ट्रक लपवून ठेवल्याच्या माहिती मिळाली होती.

<><><><><>

क्वालालंपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधुने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने जपानच्या तोमोको मियाजाकी हिचा २१-८, २१-१३ असा पराभव केला. या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत जाण्याची सिंधुची ही चौथी वेळ आहे. उपांत्य फेरीत सिंधुचा सामना चीन किंवा जपानच्या खेळाडूशी होईल. त्याआधी भारताच्या आयुष शेट्टीला चीनच्या शी युकी याच्याकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

प्रगती या व्यासपीठामुळं देशातल्या पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीला गती आल्याचं प्रतिपादन माजी कॅबिनेट सचिव आणि नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांनी केलं आहे. आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. प्रगतीच्या अंतर्गत आढावा घेतला जात असलेल्या काही प्रकल्पांची निवड खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यात नवी मुंबई विमानतळ, चिनाब नदीवरचा रेल्वेचा पूल, आसाममधला बोगीबीळ पूल यांचा समावेश असल्याचं गौबा यांनी सांगितलं. आकाशवाणीच्या एफएम गोल्ड आणि इतर वाहिन्या तसंच NEWSONAIROFFICIAL या युट्युब चॅनलवर आणि NewsOnAIR ॲपवर आज रात्री साडे ९ वाजता ही पूर्ण मुलाखत ऐकता येईल.

//<><><><><>//